महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय


# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट दि.१२/०१/२०२२

## कार्यालय प्रमुख साधतील अभ्यागतांशी ऑनलाईन संवाद, आपल्या अडचणी ऑनलाईन मांडण्याचे जिल्हा पोलीस अधीक्षकांचे आवाहन.

***

वाशिम जिल्ह्यात कोविड-१९ च्या 'ओमिक्रॉन' व्हेरीयंटच्या वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीच्या उपाययोजना म्हणून महाराष्ट्र राज्य शासनाने संचारबंदी व जमावबंदी तसेच इतर नियमावली लागू केली आहे. सकाळी ०५ ते रात्री ११ वाजेपर्यंत पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र येता येणार नाही तसेच रात्री ११ ते सकाळी ०५ वाजेपर्यंत कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक अथवा वैद्यकीय कारणाशिवाय घराबाहेर पडण्यास पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे.

कोरोना विषाणूसह 'ओमिक्रॉन' या नव्या विषाणूचा धोका निर्माण झाला आहे. या विषाणूचा संसर्ग वेगाने वाढत आहे. मागील काही दिवसात राज्यात 'ओमिक्रॉन' कोविड-१९ ने बाधितांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. वाशिम जिल्ह्यात सध्या १०१ कोविड-१९ बाधित रुग्ण आढळून आले आहे. त्यामुळे कोरोना व 'ओमिक्रॉन'चा संसर्गाचा धोका लक्षात घेता महाराष्ट्र शासनाचे आदेशाने जिल्ह्यात संचारबंदी व जमावबंदीचा आदेश लागू केले आहेत. शासकीय कार्यालयांमध्ये अभ्यागतांना कार्यालय प्रमुखांच्या स्पष्ट आणि लेखी परवानगीशिवाय प्रवेश राहणार नाही. कार्यालय प्रमुखाला नागरिकांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून ऑनलाईन संवाद साधता येईल स्थानिक अथवा बाहेरून येणाऱ्या अभ्यासासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सभेचे आयोजन करता येईल, अश्या प्रकारचे आदेश राज्य शासनाकडून प्राप्त झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर मा.महाराष्ट्र शासन, मुंबई तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांचे आदेशांन्वये कोविड-१९ च्या 'ओमायक्रॉन' व्हेरीयंटच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयामध्ये अभ्यागत/तक्रारदारास वरिष्ठ कार्यालयातील घटक प्रमुख यांना भेटीबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामध्ये अभ्यागत/तक्रारदार यांना घटक कार्यालय प्रमुख मा.पोलीस अधिक्षक साहेब, अपर पोलीस अधिक्षक साहेब तसेच शाखाप्रमुख यांना भेटण्याची आवश्यकता असल्यास त्यांनी V.C. (Video Conference) द्वारे संवाद साधण्याबाबत आवाहन केले आहे. तरी वरिष्ठांच्या भेटीकरिता Online (Google Meet, Zoom, Webex, Whatsapp Video Call) याद्वारे संवाद साधता येणार आहे. त्याकरिता तक्रारदारांनी त्यांचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, तक्रारीचे स्वरूप व तक्रारीची एक प्रत pro.washimpolice@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवावी किंवा नियंत्रण कक्ष, वाशिम यांचे Whatsapp क्रमांक ८६०५८७८२५४ या क्रमांकावर वर नमूद मुद्देनिहाय माहिती पाठवावी. या व्यतिरिक्त मा.पोलीस अधिक्षक साहेब, वाशिम, अपर पोलीस अधिक्षक साहेब व इतर

शाखाप्रमुख यांना प्रत्यक्ष भेटायचे असल्यास त्याबाबत कार्यालयाचे घटक प्रमुख यांची भेटीपूर्व लेखी परवानगी घेण्यात यावी. तरी सर्व नागरिकांना सदर सूचनांचे पालन करावे व पोलीस पाटील यांचे मार्फतीने सदर सूचनांबाबतची माहिती प्रसारित करावी, असे आवाहन मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह(IPS) यांनी केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.